**वादी तर्फे साक्षीदार क्र.४ चा जादा सरतपास अॅड.एच.एच.टोणपे यांचे मार्फत शपथेवर सुरु–**

१. (आता मला दि.१८.०३.२००८ रोजीचे खरेदीपत्र दाखवण्यात आले.)त्या खरेदीपत्रावर साक्षीदार म्हणुन माझी सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ३८** देण्यात आली.

**वादीतर्फे साक्षीदार क्र.४ चा उलट तपास प्रतिवादीतर्फे अॅड. एम.के.वलांडे यांचे मार्फत–**

२. प्रतिवादी क्र.१ च्या कुटूंबातील सर्व सदस्यांना मी ओळखतो. आजरोजी न्यायालयात हजर असलेला प्रतिवादी क्र.२ (सोमनाथ) हा जगन्नाथ याचा मुलगा आहे. त्याच्यासोबत जगन्नाथ याची पत्नी आहे. ते सर्वजण एकत्र राहतात. जगन्नाथच्या कुटूंबातील व्यवहारांची मला माहीती आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्यामध्ये वाटप झाल्याचे मला माहीत नाही. माझ्या शपथपत्रातील माहिती सोमनाथ याने सांगितली आहे. निशाणी ३८ वरील खरेदीपत्रावेळी वादी ही सज्ञान होती याचा मी कागदोपत्री पुरावा पाहिला नव्हता तसेच आजही तो पुरावा मी पाहिलो नाही. वादीला एकत्र कुटूंबातील तिचा मिळणारा हिस्सा विक्री करुन तिचे लग्न केले असे खरेदीपत्रामध्ये नमूद नाही. निशाणी ३८ च्या खरेदीपत्रास वसंत रामराव सुर्यवंशी आणि जगन्नाथ भगवंत सुर्यवंशी हे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी माझ्या गावातील असल्याने त्यांना मदत करण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.02.18 17:35:29 +0530

निलंगा

दि.१०/०१/२०२५

**(श्रीमती. ए.एस.गुंजवटे)**

२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, निलंगा.